**Golden Research Thoughts**
**Volume : 1 Issue : 2, August - 2011**
**ISSN:- 2231-5063**
Available online at www.aygrt.org

ORIGINAL ARTICLE

# स्त्री –पुरुश समानता आणि दलित स्त्रियाः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा मागोवा

*डी. आर. गायकवाड*

दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर.

**प्रस्तावनाः–**

भारतीय इतिहासाच्या विविध कालखंडात स्त्रियांच्या दर्जात सातत्याने परिवर्तन होत गेले आहे. वैदिक कालखंडात स्त्रियांचा दर्जा बऱ्याच प्रमाणात समाधानकारक होता. वेदोत्तर कालखंडानंतर ते मध्ययुगीन काळापर्यत स्त्रियांच्या दर्जात घसरण होत गेली. आधुनिक भारताच्या इतिहासात ब्रिटीश काळात स्त्रियांच्या दर्जात सुधारणा होण्यास प्रारंभ झाला. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या काळात तर भारतीय स्त्रियांच्या दर्जात अधिक वेगाने परिवर्तन होत असल्याचे निदर्शनास येते. सामाजिक, आर्थिक, राजकीय, कला, कीडा, साहित्यादि जवळपास सर्वच क्षेत्रांमध्ये स्त्रियांचा सहभाग वाढत आहे. ज्या क्षेत्रात स्त्रियांनी प्रवेश केलेला नाही असे क्वचितच एखादे क्षेत्र असेल. आधुनिक भारतात भारतीय स्त्रियांच्या दर्जात जे परिवर्तन झाले,घडून येत आहे, ते आपोआप झालेले नाही. महात्मा फुले, राजाराम मोहन रॉय, डॉ. महर्षि शिंदे, धोंडो केशव कर्वे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यासारख्याा समाजसुधारकांचे कार्य, स्त्री पुरुष समानतेच्या प्रस्थापनेसाठी करण्यात आलेले सामाजिक कायदे आणि स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेचे स्वरुप यामुळे स्त्री–पुरुष समानतेच्या दिशेने हळूहळू का होईना प्रगती होताना दिसून येते.

प्रस्तुत शोधनिंबधात डॉ.आबेंडकरांच्या स्त्री–पुरुष समानतेविषयीच्या आणि विशेषतः दलित स्त्री–विषयीच्या विचारांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला आहे. स्त्री–पुरुष समानतेच्या संदर्भात घटनेचे शिल्पकार म्हणून डॉ. आबेंडकरांचे कार्य, भारतातील स्त्रियांच्या अवनतीची त्यांनी प्रस्तुत केलेली कारणमीमांसा, स्त्री –शिक्षण संदर्भातले त्यांचे विचार,दलित स्त्रियांनी कसे वागले पाहिजे याविषयीचे त्यांचे विचार या मुद्यावर प्रस्तुत शोधनिबंधात विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. शेवटी डॉ. आबेंडकरांच्या विचारांची समकालीन समर्पकता अधोरेखित केली आहे.

## घटनेतील स्त्री–पुरुष समानतेबाबतीची तत्वेः

डॉ. आबेंडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आहेत. स्वंतत्र भारताची घटना स्त्री–पुरुष समानतेचा पुरस्कार करणारी आहे. भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यातच त्यांनी स्वातंत्र्य,समता,बंधुता आणि न्याय या मूल्यांची मांडणी केलेली आपणास दिसून येते. त्यासाठी राज्यघटनेत तशी तरतुदही त्यांनी जाणीवपूर्वक करुन राबविलेली आपणास दिसून येईल(प्रा. कांबळे सी.टी.,1994).

थोडयाशा तपशीलात जावयाचे झाल्यास, घटनेचे 14 वे कलम स्त्री–पुरुष या दोघानांही सामाजिक,आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात समान हक्क आणि संधी प्रदान करते. 15 वे कलम धर्म, वंश, जात त्याच प्रमाणे लिंगभेदावर आधारित भेदभावाला प्रतिबंध करते. तर घटनेचे 16 वे कलम खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील नोकरी बाबत समान संधीची शाश्वती देते, एवढेच नाही तर घटनेचे कलम 15(3) स्त्रियांबाबत सकारात्मक भेदभावाचे धोरण अवलंबिण्यास शासनाला मान्यता देते. (भारत सरकार,1996:24) घटनेतील ही कलम म्हणजे स्त्री–पुरुष समानतेविषयीच्या डॉ. आबेंडकरांच्या विचारांचे प्रतिबिंब आहे असे म्हणता येईल. तसेच ही कलमे आणि तरतुदी म्हणजे त्यांच्या स्त्री–पुरुष समानतेच्या मूल्याबाबतच्या वचनबध्दतेची द्योत्तक आहेत असेही म्हणता येईल.

**हिंदु स्त्रियांच्या अवनतीची डॉ. आंबेडकरांची कारणमीमांसा :**

डॉ. आबेंडकरांनी हिंदु स्त्रियांच्या अवनतीची कारणमींमासा केली होती. त्यांच्या मूळ इंग्रजी लेखाचा मराठी अनुवाद रघुवंशी गजेंद्र विठ्ठल यांनी प्रकाशित केलेल्या ''डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अतिशय गाजलेले लेख'' या पुस्तकात दिला आहे. त्यातील डॉ. बाबासाहेबांची काही निवडक आणि समर्पक विधाने खाली दिली आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिहतात, ''प्राचीन काळी हिंदुस्थानातील स्त्रियांचा दर्जा फार उच्च होता. तो अर्वाचीन काळात खाली घसरत आला याबद्दल शंका नाही.------

देशातील बौध्दिक आणि सामाजिक जीवनात स्त्रियांचा दर्जा फार उच्च होता याबद्दल कोणाला संशय बाळगता येणार नाही''.-----

'' पूर्वीच्या काळी स्त्रियांचा उपनयन विधी करण्याचा प्रघात होता---

स्त्रियां वेदांच्या निरनिराळया शाखांचा अभ्यास करीत असत.--- गुरुकुलात स्त्रिया अध्यापक म्हणूनही काम करीत होत्या. त्या विद्यार्थीनींना वेद शिकवित होत्या. ----- धर्म, तत्वज्ञान, विश्वाची उत्पत्ती इत्यादी गहन आणि जटिल विषयांवर पुरुषांबरोबर वादविवाद करणाऱ्या स्त्रिया होत्या-----जनक आणि सुलभा ,याज्ञवल्कय आणि गार्गी,याज्ञवल्कय आणि मैत्रेयी, शंकराचार्य आणि विद्याधारी यांचे वादविवाद सार्वजनिक ठिकाणी झालेले होते असे इतिहास सांगतो.'' (डॉ. आबेंडकर,हिंदु स्त्रियांची उन्न्त आणि अवनती :49-50).''पूर्वी स्त्रियांना समाजात मोठया सन्मानाने वागवले जात होते. प्राचीन काळात राज्याशिषेकाचे समारंभ होत असत, त्यात राणीला प्रमुख स्थान असे---पटटराणी आणि खालच्या जातीतील त्याच्या इतर बायका याची तो राज्याभिषेकाच्या वेळी यथासांग पुजा करीत असे.''

त्यानंतर ते असा प्रश्न करतात की, ''ज्यावेळी जगातील कोणत्याही देशात स्त्रियांना इतका मानसन्मान मिळाला नव्हता,त्यावेळी भारतातील स्त्रियांना तो मिळत होता. त्यांची नंतर जी अवनती झाली ती कोणामुळे? हिंदूना धार्मिक कायदे तयार करुन देणाऱ्या मनुमुळे! या व्यतिरिक्त प्रश्नाला दुसरे उत्तर नाही. याबद्दल कोणाला शंका येत असेल तर त्याने मनुस्मृतीत मनूने स्त्रियांच्या एकंदर जीवनासंबंधी जे धार्मिक कायदे लिहून ठेवले आहेत ते पहावेत''. असे उत्तर डॉ. आबेंडकर देतात आणि ते मनुस्मृतीत स्त्रियाबाबतचे धार्मिक विचार आणि नियम यांची यादीच सादर करतात.

मनूने नेमके काय केले आणि स्त्रियांवर मनूने एवढी बधंने याविषयी डॉ. आबेंडकर लिहतात ''मनू हा भारतातील स्त्रियांचा अधःपात घडवून आणण्यास सर्वस्वी जबाबदार आहे. हे सत्य कोणी नाकारु शकेल काय? --- मनुने जे कायदे केले--- त्या कायदयात मनुने स्वतःच्या बुध्दीमत्तेचे अगर मौलिकतेचे प्रदर्शन केलेले दिसून येत नाही. ब्राम्हणी धर्माचा उदय भारतात झाल्यानंतर ब्राम्हणाची स्त्रियासंबंधी जी विचारसारणी होती. तीच मनूने आपल्या कायदयात गोवली. मनुच्या पूर्वी ती समाजात रुढ होती,पण ती सामाजिक सिध्दांत म्हणून. त्या सिध्दांताला धार्मिक कायदयाचे रुप देऊन ते कायदे राजाज्ञेने समाजात पाळले जावेत,ही कामगिरी मनुने केली. स्त्रियांवर एवढी कडक बंधने का लादली,याचे कारण या लोकांना समजले नाही, ही दुसरी गोष्ट होय. आर्य समाजातून शूद्र आणि स्त्रिया यांचा बौध्द धर्म स्वीकारण्यासाठी एकसारखा मोठा लोंढा वाहत होता. शूद्र आणि स्त्रिया आर्य समाजाचे आणि धर्माचे आधारस्तंभ होते. ते आधारस्तंभ कोसळल्यानंतर आर्य समाज आणि धर्म हे नष्ट होण्याच्या मार्गाला लागले होते. तेव्हा हा लोंढा थांबविण्यासाठी मनूला कायदयाचा मोठा बांध तयार करणे भाग पडले. मनूने स्त्रियांवर बंधने लादून त्यांचे जीवन कायमचे खुरटून टाकले, ते बौध्द धर्माकडे असलेला स्त्रियांच्या ओढा नष्ट करण्यासाठीच.''(कित्ता पान :50-54)

***स्त्री-शिक्षणाच्या महत्वाबाबतचे डॉ. आंबेडकरांचे विचारः***

शिक्षण हा स्त्रियांच्या दर्जात उन्नती घडवून आणणारा एक महत्वाचा घटक आहे, अशी डॉ. आबेंडकरांची ठाम धारणा होती. वैदिक कालखंडातील स्त्रियांच्या उच्च दर्जाची कारणमीमांसा स्पष्ट करताना डॉ. आबेंडकर लिहितात, ''मनूच्या पूर्वीच्या काळात हिंदुस्थानातील स्त्री विद्याभ्यासाच्या जोरावर उच्चतम पदी जाऊ शकत होती''. यावरुन स्त्री शिक्षणाच्या महत्वाबाबतची डॉ. आबेंडकरांची धारणा स्पष्ट होते. डॉ. आंबेडकर स्त्री शिक्षणविषयक व्यापक दृष्टीकोन स्पष्ट होतो.

त्याचबरोबर आधुनिक काळातही स्त्री शिक्षणाचे महत्व विशद करताना डॉ. आबेंडकर आपल्या भाषणात म्हणतात,''ज्ञान आणि विद्या या गोष्टी काही पुरुषांसाठीच नाहीत. त्या स्त्रियांनाही आवश्यक आहेत. ही गोष्ट आपल्या पूर्वजांनाही ओळखली होती. 'खाण तशी माती' ही गोष्ट ध्यानात ठेवून आपली पुढील पिढी जर तुम्हाला सुधारावयाची असेल,तर तुम्ही मुलींना शिक्षण द्या--(डॉ. आबेंडकर,1986:35).''

डॉ. आबेंडकर आणखी एके ठिकाणी लिहितात''विद्यार्थी दशेत असल्यापूनच मुलांप्रमाणे मुलीनींही शिक्षण घेतले पाहिजें. सर्वच क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांनी वावरले पाहिजे'' (केळकर,1994:91–92)

तसेच ,दलित स्त्रियांना तर शिक्षणाची आत्यंतिक गरज होती हे ओळखून दलित महिलांना उद्येशून ते म्हणतात,''दलित महिलांनो,तुम्ही आपल्या मुलांना शिक्षण द्या त्यांच्यात महत्वकांक्षा निर्माण करा. त्यांच्या मनातून सर्व प्रकारच्या हीनत्वाची भावना काढून टाका. त्यांची लग्ने लवकर करण्याची घाई करु नका. कारण लग्न ही जबाबदारी असते. प्रत्येक मुलीने नवऱ्याची दासी नव्हे तर मित्र म्हणून वागावे. याचप्रमाणे तुम्ही वागाल तर स्वतःचा त्याचबरोबर दलित समाजाचाही अभ्युदय कराल''(1986:35). दलित स्त्रियांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करुन स्वतः शिकावे व इतरांनीही शिकावे असे प्रयत्न केले पाहिजेत. न्युनगंड काढून टाकून सन्मानाने जगावे असे डॉ. आंबेडकर सांगतात.

### *दलित स्त्रियांनी कसे वागले पाहिजे:*

डॉ. आबेंडकर दलित स्त्रियांना सांगत,''तुम्ही आमच्या आया–बहीणी आहात. आपल्या मुलांना शिक्षण द्या. नवरा, मुलगा किंवा भाऊ पिऊन घरात आला तर त्याला घरात घेऊ नका, जेवण देऊ नका,मुलीनां शिक्षण द्या. तसेच तुमची लुगडी नेसण्याची पध्दत,गळयात भाराभर गळसया व हातात कोपराभर कथलांचे किंवा चांदीचे दागिने घालण्याची पध्दत सोडून द्या––– स्वच्छ कपडे घाला––''(दीक्षित,1986:35).

त्याचबरोबर पूर्वीच्या काळी मुबंईतील कामठी पुऱ्यामध्ये गोलीपीठात अनेक दलित स्त्रिया हया वेश्या व्यवसाय करणाऱ्या होत्या. दलित कार्यकर्त्यांच्या साहयाने दलित वर्गीय वेश्यांची 16 जून 1936 रोजी डॉ. आबेंडकरांनी सभा घेतली. या सभेत डॉ. आबेंडकरांनी रुढी–परंपरेच्या संदर्भात प्रखरपणे मत मांडले,आणि वेश्येचा धंदा सोडण्याबद्दल स्पष्ट शब्दांत सांगितले की, तुम्ही वेश्या व्यवसाय सोडला पाहिजे (खरात,1987:219–221). डॉ. आबेंडकर त्यावेळी म्हणाले होते की, ''समाजाचा जो भाग अत्यंत हीन समजला जातो–––––– धर्माच्या नावाखाली अनैतिक रीतीने आपला निर्वाह करणाऱ्या या तुम्ही स्त्रिया आहात. ज्यांचा अभिमान लुप्त झालेला आहे. आज मुंबई शहारात महार समाजाला कोठे लज्जेने मान खाली घालावी लागत असेल तर तुमच्या कामाठीपुऱ्यातून जाताना–––कष्टाने जे मिळेल त्यात सुख माना आणि जर तुम्ही आयुष्यक्रम पूर्ववत चालू ठेवला तर मी बजावून सांगतो की, हजारो तरुण स्वयंसेवक तयार करुन मी तुमचा कामाठीपुऱ्यातून उठाव करीन''. (कित्ता:220) डॉ. आंबेंडकरांचा वाईट गोष्टीना, व्याभिचाराला विरोध होता. कष्ट करुन,प्रामाणिकपणे माणसाने जगले पाहिजे अशी त्यांची धारणा होती.

### *विविध चळवळीत दलित स्त्रियांचा वाढता सहभाग:*

डॉ. आबेंडकरांनी दलित स्त्रियांना जे मार्गदर्शन केले त्यातून प्रेरणा घेऊन बहुसंख्येने दलित स्त्रिया संघटित होऊ लागल्या. मोर्चे,मिरवणुकीत सहभागी होऊ लागल्या. डॉ. आबेंडकरांच्या जीवनकाळात तसेच त्यानंतरही हे दिसून येत आहे.

'शिका, संघटित व्हा,संघर्ष करा' या घोषवाक्यातून समस्त दलित वर्गाचे आत्मभान जागृत केलेले आहे. महाडच्या सत्याग्रहाच्या वेळी डॉ. आबेंडकरांनी जी सभा घेतली त्या सभेत महिला मोठया प्रमाणावर सहभागी झालेल्या होत्या. त्यानंतर 19 ऑगस्ट 1930 रोजी दलित परिषद भरविण्यात आली. यानंतर पुण्यात अखिल भारतीय महिलांची परिषद घेण्यात आली. हीच दलित महिलांची परिषद होय. यानंतर नागपूर (1931साली), मलकापूर (जि. नांदेड), कोरेगाव(6 एप्रिल 1934), तुमसर(1939), नागपूर(1938) अशा वेगवेगळया ठिकाणी दलित महिला परिषदा भरविण्यात आल्या. त्यात गुणाबाई गाडेकर, शेवंताबाई ओगले, जाईबाई चौधरी, केसरबाई वाकोडे, राधाबाई तायडे, काशीबाई भगत, सुभद्राबाई रामटेके, सुलोचना डोंगरे आदी महिलांनी महत्वपूर्ण कामगिरी केली.

स्वातंत्र्योत्तर काळातही दलित चळवळ, कामगार चळवळ स्त्री–मुक्ती चळवळ यामध्ये स्त्रियांचा सहभाग वाढला आहे. डॉ. नीलम गोऱ्हे, बेबी कांबळे, हिराबाई बनसोडे यांचे कार्य महत्वपूर्ण ठरले आहे(सांळुखे,1995:13). स्वातंत्र्योत्तर काळातही डॉ. आंबेडकर हेच दलित चळवळीचे प्रेरणास्त्रोत राहिले आहेत. याबाबत डॉ. काचोळे लिहतात की,''स्वांतत्र्योत्तर काळातील सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, तसेच साहित्य विषयक चळवळीची प्रेरणा डॉ. आबेंडकर आहेत. समाजातील अन्याय, विषमता आणि मुल्य परिस्थितीवर पोसणाऱ्या प्रवृत्तीवर प्रहार करुन माणसाला माणुसपणाचे हक्क व प्रतिष्ठा मिळवून देऊ इच्छिणाऱ्या आजच्या दलित चळवळीला डॉ. बााबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीची प्रेरणा मिळालेली आहे''. (काचोळे,1994). डॉ. आंबेडकरांचे जीवनकार्य आणि विचारविश्व यांच्यातून प्रेरणा घेऊन दलित स्त्रिया विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत आहेत.

***डॉ. आंबेडकरांच्या विचारांची समकालीन समर्पकताः***

सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठी,मागास आणि दलित समाजाच्या उन्नतीसाठी राखीव जागांचे धोरण आवश्यक आहे. असा डॉ. आंबेडकरांचा दृष्टीकोन होता. याच धोरणाचा अवलंब स्त्रियांच्या राजकीय सबलीकरणासाठी 13 व्या आणि 74 व्या घटना दुरुस्तीच्या माध्यमातून करण्यात आला आहे. सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठी स्त्री–पुरुष समानता आवश्यक आहे., याच दृष्टीकोनातून 73 वी आणि 74 वी घटना दुरुस्ती महत्वाची ठरते. ज्याप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्त्रियांना आरक्षण दिले आहे, त्याचप्रमाणे राज्यसभा आणि लोकसभेतही आरक्षण दिले गेले तर डॉ. आंबेडकरांचे विचार आजच्या काळासाठी किती उपयुक्त आहेत हे सिध्द होईल. त्यासाठी नियोजनपूर्वक सर्वसमावेशक लढा उभा करण्याची आवश्यकता आहे.

तसेच हिंदू स्त्रियांना बंधनात जखडणाऱ्या मनुच्या विचारांचा पगडा आजही भारतीय समाजव्यवस्थेत असलेला निदर्शनास येतो. आजच्या विज्ञानयुगातही स्त्रीवर अन्याय, अत्याचार होताना दिसतात. तेव्हा समाजाची मानसिकता बदलण्याची गरज आज समाजाला आहे. यासंबंधी डॉ. आंबेडकरांचे विचार मार्गदर्शक आहेत.

शिक्षण हा स्त्रियांच्या दर्जात उन्नती घडवून आणणारा महत्वाचा घटक आहे. वैदिक कालखंडात स्त्री वेदाभ्यासाच्या जोरावर उच्चतम पदावर जाऊ शकत होती हे डॉ. आबेंडकरांचे निरीक्षण आजच्या काळातही समर्पकच आहे. आजही पुरुषांच्या तुलनेत स्त्रिया विविध क्षेत्रात मागे आहेत. उच्च पदावरील स्त्रियांचे प्रमाण अत्यंत कमी आहे याचे प्रमुख कारण म्हणजे स्त्रिया शिक्षणाच्या बाबतीत मागे आहेत. 1951 ते 1991 या चार दशकात एकूण साक्षरतेच्या प्रमाणात वाढ झाली असली तरी (1951,18.33%आणि 1991,52.52%)संपूर्ण साक्षरतेचे उद्दिष्ट मात्र साध्य झालेले नाही. त्यातही स्त्री–पुरुष साक्षरतेत कमालीची विषमता आढळते. 1951 मध्ये स्त्री साक्षरता 8.86% तर 1991 मध्ये 39.29% इतक्याच प्रमाणात होती. म्हणजेच सुमारे 60% स्त्रिया अजूनही निरक्षरच आहेत. स्वातंत्र्यानंतरच्या काळात शासनाने नेमलेल्या शिक्षण आयोगानी,समित्यांनी त्याचप्रमाणे स्त्रियांच्या दर्जाच्या अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या समितीने आणि नव्या शैक्षणिक धोरणानेही स्त्री शिक्षणाचे महत्व अधोरेखित केले आहे. (Agrawat and Agarwal,1992) शिक्षण हेच स्त्रियांच्या सबलीकरणाचे महत्वाचे साधन आहे. या पार्श्वभूमीवर डॉ. आंबेडकरांचे स्त्री शिक्षण विषयीचे विचार आजही मार्गदर्शक आहेत.

सर्वसाधारण निरीक्षणावरुन असे निदर्शनास येते की दलित समाजात स्त्री–शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांची संख्याही तुलनेने अधिक आहे. अज्ञान, अंधश्रध्दा, रुढी, परंपरा यांचा पगडा दलित स्त्रियांवर जास्त प्रमाणात आहे. विविध चळवळीतील दलित स्त्रियांचा सहभाग लक्षणीय प्रमाणात असला तरी अजूनही तो वाढण्याची आवश्यकता आहे.

प्रत्येक मुलीने नवऱ्याची दासी म्हणून नव्हे तर मित्र म्हणून वागावे' हा डॉ. आबेंडकरांचा विचार स्त्री–पुरुष समानतेकडे नेणारा आहे. डॉ.आबेंडकरांनी दिलेले स्त्री–पुरुष समानतेविषयीचे सर्वच जाती–धर्मातील सर्वानाच सारख्याच प्रमाणात लागू आहेत. विशेषतः डॉ. आबेंडकरांचे स्त्री–पुरुष समानतेबद्दलचे आणि त्यासाठीच्या आरक्षण धोरणाबाबतचे विचार, स्त्री–शिक्षणाच्या महत्वाबाबतचे, दलित स्त्रियांमध्ये सुधारणा घडवून आणण्याबाबतचे ,समता आणि सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठी संघटित होऊन संघर्ष करण्याबाबतचे असे सर्व विचार आजही समर्पक आहेत मार्गदर्शक आहेत. आजच्या स्त्री–चळवळीच्या संदर्भातही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार महत्वाचे आहेत. स्त्री–पुरुष समानता प्रस्थापित करणे हेच आजच्या स्त्री–मुक्ती चळवळीचे मुख्य उद्दिष्ट आहे. भारतीय समाजात बहुसंख्येने असलेल्या दलित स्त्रिया त्यांचे शिक्षण आणि स्त्री मुक्ती चळवळीतील त्यांचा सहभाग वाढणे स्त्री मुक्तीच्या चळवळीतील व्यापक यशस्वीतेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे. चळचळी आणि आंदोलने या मार्गाने आपल्या हक्कांचे आणि हितसंबंधाचे संरक्षण आणि संवर्धन करण्याचा डॉ. बाबासाहेबांनी दिलेला सल्ला स्त्री चळवळीला आजही तेवढाच लागू आहे. त्यांच्यावरील तसेच तद्नुषंगिक मांडलेल्या विचारांचा अंगिकार केल्यास केवळ दलितच नव्हे तर एकूणच स्त्री विकासाला गती मिळून राष्ट्र सर्वार्थाने शक्तीशाली होईल.

***संदर्भ–***

1. Dr- Ambedkar B.R.(1970)"The Rise and Fall of Hindu Women",Bheem Patrika publication,Nakodar Road,Jallundur-3(punjab) India,pp21-27
2. डॉ. आंबेडकर बी.आर. 'हिंदु स्त्रियांची उन्नती आणि अवनती'',डॉ. आंबेडकरांचे अतिशय गाजलेले लेख' प्रकाशक : गजेंद्र विठ्ठल रघुवंशी, 10 सत्यनिवास भवानी शंकर रोड,दादर मुंबई, 28
3. Agrawal S.P. and Agrawa; J.C. (1992) : "women Education in India",concept publication,New Delhi.
4. Agrawal S.P. and Agrawa; J.C. (1996) : "women Education in India 1988-1994",concept publication,New Delhi.
5. भा. कृ. केळकर (1994) 'भारतभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर,सुगावा प्रकाशन,पान क. 91–92.

6. प्रा. कांबळे सी.टी.(1994)'डॉ. आबेंडकरांचे समाजशास्त्रीय चिंतन',स्मरणिका,राज्यस्तरीय मराठी समाजशास्त्र परिषद 9 वे अधिवेशन,चंद्रपूर
7. डॉ.दा.धो. काचोळे (1994) : डॉ. महाराष्ट्रातील स्वातंत्र्योत्तर काळातील सामाजिक परिवर्तनाच्या दलित चळवळी–एक समाजशास्त्री दृष्टीकोन' 9 वे अधिवेशन,चंद्रपूर
8. म.श्री. दीक्षित,(1986) : 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचारधन',पान न. 35
9. खरात शंकरराव (1987) : ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आत्मकथा',पान नं. 210–221.
10. डॉ. सांळुखे एस.ए. (1995) : 'स्त्रियांची चळवळ आणि महाराष्ट्र
11. शासनाचे महिलाविषयक धोरण–मागोवा आणि भवितव्य',रयत रिसर्च जर्नल,अंक3,पान क.
12. भारत सरकार (1996): स्त्री आणि बालविकास विभाग तसेच मानवसंसाधन मंत्रालय द्वारा प्रकाशित (1996 मार्च) –4th world confererence on women Bejing 1995; country Report,p.24



***डी. आर. गायकवाड***
दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर.